राशिंगकर, पंगू, रामभाऊ गोखाले, दिगवडेकर, तात्या आपटे, सदाशिव खंडो आळतेकर, श्रीपाद यशवंत अभ्यंकर इत्यादि म्हणजे तत्कालिन आघाडीवरचे वकील हे सभासद होते.

'ना विष्णुः पृथ्वी पतिः' ही जी राजाकडे पाहण्याची परंपरागत दृष्टी, ती बदलून टाकून, 'राजा हा प्रजेचा सेवक आहे' ही दृष्टी इतःपर ठेवली पाहिजे हा या सभेमध्ये मुख्य सूर होता. अशा सभेकडे आणि त्यांच्या सभासदाकडे करवीर दरबारची (आणि या बरोबरच ब्रिटिश राजवटीचे दडपणहि आल्याने) वक्र दृष्टी वळावी व दडपशाहीचे सत्र सुरू व्हावे हे क्रमप्राप्तच होय. त्याचे परिणाम अनेक वकिलाना सोसावे लागले. दिगवडेकर, अभ्यंकर, गोखले, आळतेकर प्रभृति वकील हे हद्‌पार झाले. राशिंगकर वकील हे लगेच १९०७ साली प्लेगने वारले म्हणूनच सुटले. पंगू, आपटे प्रभृति काही वकील येथे टिकले पण त्याची कारणपरंपरा अन्य होती. या दृष्टी-नेच एक प्रभावी नियंत्रण म्हणून दरबारने १९०८ पासून वार्षिक सनदा देण्याची मागे उल्लेखलेली प्रथा सुरू केली. हेतु हा की चळवळ करणाऱ्या अगर संशयिताची सनद रिन्यूच केली नाही म्हणजे आपोआपच त्यास शिक्षा होते. या शस्त्राचा वापर कदाचित् झालाहि नसावा; पण लटकती तलवार मात्र कायम होती. या पाठोपाठच राजद्रोही लेख लिहिल्याबद्दल येथे शाहूपुरीत 'समर्थ विद्यालय' नावाची राष्ट्रीय शाळा १९०६ साली काढलेल्या सुप्रसिद्ध प्रा. **आण्णासाहेब विजापूरकर** प्रभृतीवर व त्यानंतर वेदमूर्ति **पं. सातवळेकर** यांचेवर खटले झाले. काहीना शिक्षा झाल्या, काही सुटले याचा उल्लेख अन्यत्र होईलच.

या सर्वांचा एक मोठा दुःष्परिणाम असा झाला की वकील-वर्गाने एकंदरीने चळवळीची केवळ राजकीयच नव्हे तर इतर सामाजिक, क्लब सारख्या संघटनेची हाय खाल्ली. याच कारणाने बार असोशिएशनसारखी स्वतःची संघटना स्थापन होण्यास १९२९ साल हे उजाडावे लागले आणि ते सुद्धा बराच वादविवाद, मतभेद वगैरे होऊन. पुनः महात्मा गांधीजीची सत्याग्रही मोहिम व १९४२ ची चलेजाव मोहिम सुरू झाली आणि त्या चळवळीतहि आमचा वकीलवर्ग मागे पडला नाही याबद्दलचा इतिहास पुढे येईलच. ज्या दिवंगत व्यक्तींनी या शतकाचे सुरवातीस राजकीय चळवळीचे बीजारोपण केले व त्याकरिता कोणत्या ना कोणत्या स्वरुपात स्वार्थत्याग केला त्यांच्याबद्दल गौरवाने व अभिमानाने उल्लेख करणे हे आमचे कर्तव्य म्हणून त्या हकीगतीचा थोडा विस्ताराने परामर्ष घेतला आहे. संस्थानांतील सनदशीर चळवळीचा हा पाया होय.

# ३

## या शतकातील नाणावलेली वकील परंपरा

या यादीची सुरवात **रामचंद्र नारायण उर्फ भाऊसाहेब पंगू** यांच्या नावाने करणे योग्य ठरेल. हे मुंबईच्या डिस्ट्रिक्ट प्लीडर्सची परीक्षा पास होते खरे, पण बुद्धीमत्ता वरच्या दर्जाची आणि विशेषतः स्मरणशक्ति तर असामान्य होती. कायद्याचे आधार ते टिप्पण न पाहता अचूक सांगत. फार थोडक्यात तक्रारी सांगण्याची त्यांची हातोटी होती. अधिकतर त्यानी दिवाणी शाखेकडे काम केले. शिवाय वाचन, कला, लोकसंग्रह वगैरेंचा त्याना षौक फार मोठा. वृत्ति अत्यंत उदार व खर्चिक असल्याने त्यांच्या वाड्यात नेहमी काहीना काही बैठकी, अन्नसंतर्पण वगैरे कार्यक्रम चालू असत. राष्ट्रीय चळवळीत त्यानी भाग घेतला होता हे मागे पाहिलेच आहे. त्यानी सुमारे ४० वर्षांवर वकिली केली. १९३० ला ते वारले.

याच राष्ट्रीय चळवळीत भाग घेणारे **रामचंद्र मोरेश्वर उर्फ तात्या आपटे** हे बी.ए., एलएल्.बी. वकील अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. फौजदारी व दिवाणी कामे ते सारख्याच कर्तबगारीने चालवीत. खोचक उलटतपासणी व ठाशीव स्वरुपाच्या तक्रारी ते करीत. त्यांचा संस्कृतचा व्यासंगहि चांगला होता. 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' (न्या. रानडे यांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद) हे पुस्तक त्यांनी लिहिले. त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या. ते निर्भिड होते व वकिलांची प्रतिष्ठा राखली जावी याकरिता कोशीस करीत. बार असोशिएशन स्थापन करावी म्हणून त्यांनी प्रथम अध्यक्ष होऊन पुढाकार घेतला व सरकारी अधिकाऱ्याशी वाद केला. कारण वकिलांची अशी संघटना असू नये असे पूर्वानुभवावरून सरकारास त्यावेळी वाटत होते. यानी १८९७ ते १९३० मृत्यूपर्यंत वकिली केली.

फौजदारी कामात अत्यंत नाणावलेले व थोड्याच कालात प्रसिद्धी व पैसा भरपूर मिळविणारे म्हणून **गणपतराव जोशी** यांचा उल्लेख करावा लागेल.

**विष्णु विनायक उर्फ अण्णासाहेब जोशी** हे कोल्हापूर 'स्टेट प्लीडर' होते. १८९८ ला त्यानी वकिलीस सुरवात केली. दिवाणी फौजदारी व मुलकी असे सर्वतऱ्हेचे काम त्यानी सारख्याच प्राविण्याने चालविले. भरपूर अभ्यास व चिकाटीचे प्रयत्न हे त्यांचे धंद्याचे वैशिष्टच होते. त्यानी सार्वजनिक कामातहि पुष्कळ भाग घेतला. अनेक बँका, सोसायट्या यांचे अध्यक्ष होते. धार्मिक विषयावर वाचन, लिखाण व प्रवचने केली. बार असोशिएशनचे कित्येक वर्षे अध्यक्ष. सुमारे ४५ वर्षे वकिली करून ते निवृत्त झाले. (मृत्यू १९५९)

तडफदार व चतःस्त्र बुद्धीचे वकील म्हणून **गणेश हरी उर्फ बाळासाहेब करमरकर** यांचा उल्लेख केला पाहिजे. ते बी.ए., एलएल्.बी., संस्कृतचे स्कॉलर, वृत्तीने दिलदार व रसिक असे होते. त्यानी येथे १९११ पासून १९२६ पर्यंतच येथे वकिली केली व नंतर पुण्यास वकिली केली. दोन्ही ठिकाणीहि त्यानी आपल्या धंद्यात नाव केले. (मृत्यू १९६२.)

**सदाशिव रामचंद्र तथा बापूसाहेब श्रीखंडे**, बी. ए., एल्एल्. बी. यांनी १९ व्या शतकाचे अखेरीस वकिलीस सुरवात करून जवळजवळ ४० वर्षे वकिली केली. कोल्हापूरच्या वैशिष्टयपूर्ण मुलकी कायद्यान्वये चालणाऱ्या कामातून त्यांनी विशेष प्राविण्य दर्शविले. अधिकृत बार असोशिएशनचे ते पहिले (आणि पुढे कित्येक वर्षे) अध्यक्ष होते. ज्ञानार्जन, वाचन तसेच विद्यादान यात गर्क. संगीतप्रेमी, प्रजापरिषदेचे निर्भिड व निर्भय सल्लागार. (मृत्यू १९४४)

श्रीखंडे यांच्या पाठोपाठ मुलकी कामातील विशेष तज्ञ म्हणून **व्ही. बी. उर्फ आप्पासाहेब महेकर** यांचा उल्लेख करावा लागेल. आमचा मुलकी, वटहुकूमाचा कायदा (आणि विशेषतः वटहुकूमाची पुस्तके प्रसिद्ध होईपर्यंत) हा अवघड फक्कड असा होता. त्या कारणाने मुलकी प्रॅक्टिस हे त्यातील specialized तज्ञांकडे विशेषत्वाने असे. महेकर हे त्यापैकी एक होत.

## सरस पितापुत्रांची परंपरा

**गोविंद कृष्ण सोवनी** बी. ए., एल्एल्. बी. हेसुद्धा अत्यंत हुषार, परीक्षामधून अनेक पारितोषके पटकाविलेले आणि वकिलीच्या धंद्यात नामांकित असे वकील होते. विशेषेकरून ते फौजदारी कामे चांगले चालवीत. या कारणाने त्यांची गव्हर्मेंट प्लीडर व सरकारी प्रॉसिक्यूटर म्हणून १८९३ साली नेमणूक झाली. त्या पदावर ते १९२१ सालापर्यंत म्हणजे अठ्ठावीस वर्षे होते. मृत्यू १९२७.

वडिलांची परंपरा कायम राखून धंद्यामध्ये व इतर क्षेत्रातहि नावलौकिक चांगला मिळवला अशा रावसाहेब **यशवंत गोविंद उर्फ पंडितराव सोवनी** यांचा पाठोपाठ उल्लेख करणे इष्ट ठरेल. हेहि कॉलेजमध्ये अत्यंत हुषार विद्यार्थी म्हणून होते. वकिलीला सुरवात केल्याबरोबर थोडयांच वर्षात त्यांचीहि गव्हर्मेंट प्लीडर व पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून नेमणूक झाली. (१९२५ ते १९४४ या मुदतीत ते प्रॉसिक्यूटर होते.) त्यानंतर सहा वर्षे ते येथील डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज होते. १९३५ ते १९४४ पर्यंत लॉ कॉलेजचे प्राध्यापकहि होते. १९५३ मध्ये ते निवर्तले.

अशीच उज्ज्वल परंपरा राखली ती बागल पिता-पुत्रानी होय. **खंडेराव गोपाळराव बागल** ( जन्म १८७२ मृत्यू १९३१). अत्यंत गरीब स्थिती व बिकट परिस्थितीतून त्यानी शिक्षण घेतले. मराठा समाजातील ते पहिले बी. ए., एल्एल्. बी. होत. प्रथमतः १९०२ ते १९१० पर्यंत त्यांनी मामलेदार–मुन्सिफ अशी सरकारी नोकरी केली. पुढे वकिलीस आरंभ केला. त्यांची तक्रारीची पद्धत अत्यंत आर्जवी तशीच प्रभावी असे. ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाचे ते पुरस्कर्ते असूनहि त्यांचे सर्व ब्राम्हण वकील मित्राशी फार खेळीमेळीचे संबंध राहिले हा त्यांचा स्वभाव विशेष होय. वकिलीबरोबरच खंडेरावांची स्मृति त्यानी जो 'सत्यशोधक समाज' स्थापण्यात पुढाकार घेतला व सामाजिक विशेषतः बहुजनसमाजाच्या उद्धाराचे कार्यास वाहून घेतले त्या योगे विशेष राहिली आहे. त्यानी 'हंटर' साप्ताहिक सुरू केले.

त्यांचे चिरंजीव **वसंतराव बागल** हे वडिलांचेप्रमाणेच पदवीधर व वकिलीचे धंद्यात, विशेषतः फौजदारी खटले चालविण्यात चांगले वाकबगार असे होते. पण त्यांचे नांव कोल्हापूर आणि इतरत्र विशेष झाले ते त्यांच्या राजकीय चळवळीमुळे व प्रभावी वक्तृत्वामुळे. इंग्रजी, हिंदी व मराठी अशा वक्तृत्व स्पर्धेत त्यानी अनेक ठिकाणी बक्षिसे मिळविली होती. तो प्रभावी वक्तृत्वाचा गुण त्याना राजकीय व्यासपीठावर फार उपयोगी पडला. त्यांचे थोरले बंधू भाई **माधवराव बागल** यानी जी प्रजापरिषदेची कोल्हापुरात चळवळ सुरू केली त्यात सामील होणे हे वसंतरावाना क्रमप्राप्तच होते. १९४१ साली ते प्रजापरिषदेच्या संघातर्फे निवडून येऊन नगरपालिकेचे अध्यक्ष झाले. १९४७ साली संस्थान प्रजापरिषदेच्या पहिल्या मंत्रीमंडळाचे **पहिले चीफ मिनिस्टर** म्हणून नियुक्ती होण्याचा त्याना मान मिळाला. इतरहि अनेक संस्थाशी त्यांचा पदाधिकारी म्हणून संबंध होता. (मृत्यू १९५७)

सनदी वकील असूनहि वकिलीत नावलौकिक कमावलेले म्हणून पिता–पुत्र **रघुनाथ भगवंत उर्फ तात्या व त्यांचे चिरंजीव बाळकृष्ण रघुनाथ उर्फ बळवंतराव तेंडुलकर** यांचे उदाहरण देता येईल. (बॅ. एस्. आर. तेंडुलकर पुढे हायकोर्ट न्यायाधीश हे तात्यांचे कनिष्ट चिरंजीव होत.) दोघेहि हुषार आणि निधड्या छातीचे. दोघेहि फौजदारी कामेच अधिकतरं चालवीत. त्यांची उलट तपासणी साक्षीदारास भयभीत करणारी अशी आणि कोर्टापुढील भाषण अत्यंत जोरदार व आग्रही असे. बळवंतराव हे प्रजापरिषदेचे कार्यात भाग घेत. म्यु. प्रेसिडेंट व बार असोसिएशनचे प्रेसिडेंट ते होते. १९४२ नंतरच्या राजकीय आंदोलनातील खूप कामे त्यानी चांगली चालविली. तात्या १९५१ ला तर बळवंतराव १९६७ ला वारले.

* * *

**सखाराम पांडुरंग सावंत**, एम्. ए., एल्एल्. बी. यानी १९२७ पासून अवघी ६ वर्षेच वकिली केली. कारण १९३३साली ते लॉ कॉलेजमध्ये शिकवीत असता त्यांचा अपघाती मृत्यू झाला. थोडयाच अवधीत त्यानी जी तडफ व चमक दाखविली त्यावरून ते पुढे वकील म्हणून चांगले नावलौकिकास आले असते. त्यानी 'छत्रपति' नावाचे मासिक चालविले होते.

**राजाराम तुकाराम बगाडे**, बी. ए., एल्एल्. बी. यानी कोल्हापुरात तीस वर्षे वकिली केली. वकिली व्यतिरिक्त त्यानी सामाजिक व राजकीय चळवळी खूप केल्या. प्रथम सत्यशोधक

श्रेष्टीनी त्यागहि केला व कारावासहि सोसला. कोल्हापूर नगरपालिका लोकनियुक्त झाल्यावर ते पहिले अध्यक्ष म्हणून निवडून आले. काही वर्षे ते जिल्हा, लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. मुंबई विधान सभेवरहि ते निवडून गेले.

प्रजा परिषदेच्या लढ्यात बगाडे वकिलानी भाग घेतल्याचा उल्लेख आलाच आहे. शिवाय कै. जी. डी. पाटील, डी. डी. वर्धमाने, कै. बळवंतराव तेंडुलकर, व्ही. एस. फडणीस या वकिलांनीहि कमी-जास्त प्रमाणात त्या चळवळीत भाग घेतला.

श्री. ज्ञानदेव संतराम खांडेकर हे संस्थानच्या कायदे-मंडळात १९४५ ला निवडून आले. १९४७ मध्ये ते लोक-नियुक्त महसूल मंत्रि झाले. विलिनीकरणानंतर ते १९५२, ५७ व ६२ या तीन वेळा मुंबई विधान सभेवर निवडून गेले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात कारावास सोसला. अनेक कामगार, शेतकरी वगैरे संघटनांचे ते अध्यक्ष होते व काहीचे आजहि आहेत.

श्री. त्र्यं. सी. कारखानीस हेहि अनेकवेळा विधि मंडळावर निवडून गेले आहेत. याशिवाय विधिमंडळावर निवडून जाणाऱ्यामध्यें श्री. डी. डी. बराले, के. एल्. मोरे, पी. बी. साळुंखे, यांचा उल्लेख केला पाहिजे. के. एल्. मोरे हे लोकसभेवरहि एकदा निवडले गेले. श्री. पी. बी. साळुंखे हे सध्या महसूल न्याय मंडळाचे सदस्य आहेत. त्यानी स्फुट साहित्य लिहिले आहे.

कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणून श्री. जी. पी. पानसरे यांचा उल्लेख केला पाहिजे. या चळवळीनिमित्ताने त्यानी अनेकवेळा कारावास व स्थानबद्धता पत्करली.

श्री. आर. एच्. चौगुले हे होमगार्डच्या चळवळीशी निगडीत असून ते बरेच वर्षे कमांडंट आहेत.

श्री. डी. आर. बगाडे यांनी सेवादल, युवक संघ अशा तऱ्हेच्या संघटनामधून काम केले आहे. ते एक वर्ष म्युनिसिपल नगराध्यक्ष होते.

## साहित्य : लेखन

श्री. डी. एस्. बन्ने यांनी मुल्लाच्या हिंदू लॉ चे आधारे 'हिंदू कायद्याचे निबंध' हे १९१९ साली मराठीत तयार केले व पुढे ते सरकारनें कायदा म्हणून अंमलात आणले. त्यांनी नुकतेच 'भगवद् गीता' या ग्रंथाचा संदेश या विषयावर अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले आहे.

श्री. श्री. रा. पोतनीस यानी दुसऱ्या महायुद्धापूर्वी जी स्फोटक परिस्थिति निर्माण झाली होती त्यावर 'भडकत्या ज्वाळा' हे पुस्तक १९३८ ला लिहिले. युद्धोत्तर 'उद्याचे जग' हे पुस्तक त्यानी प्रसिद्ध केले. त्यानंतर 'महागाई कां' (१९४३) हे पुस्तकहि लिहिले.

श्री. रा. ना. पुसाळकर यानी ऑल इंडिया रिपोर्टर, डोमिनियन लॉ रिपोर्टर वगैरे मध्यें कायद्याच्या प्रश्नासंबंधी अनेक लेख लिहिले. 'यशवंत' व 'ज्ञान मंदीर' या मासिका-तूनहि त्यानी अन्य तऱ्हेचे लिखाण केले.

श्री. न. वि. (बाबूराव) जोशी यांनी संगीत व नाट्य या विषयावर अभिनव पद्धतीने सप्रयोग शेकडो व्याख्यानें ठिक-ठिकाणी दिली. 'संगीताचे रसग्रहण', 'संगीताने गाजलेली रंगभूमि', 'Understanding Indian Music' अशी पुस्तके त्यानी लिहिली. भारतीय संगीताची आंतरराष्ट्रीय समजूत करून देण्यासाठी Introducing Indian Music या नावचा चार दीर्घ ध्वनिमुद्रिका व एक पुस्तक असा अभिनव संच त्यानी स्वतःचे जबाबदारीवर प्रकाशित केला,

## न्यायदान

होय ! डोळे बांधुन धरलाय् तोल,
न्याय हवाय् ना अनमोल !

देवबाप्पा आभाळात – धर्म राहिला पुराणात,
पुण्याईला अर्थ उरला – पापाच्याच ओठातला,
स्तोत्र कंठी ध्वनीत नाही – आत्मयज्ञ स्वप्नात नाही,
जनी जनार्दन जागा झाला – 'लोकवेद' लिहून झाला!

मूलभूत हक्क घटनाबद्ध – लोकमंत्री शपथबद्ध,
कल्याणकारी राज्य व्हावे – कायद्यांचे प्राण साकारावे,
न्यायबुद्धी स्वतंत्र आहे – न्यायमूर्ति प्रेरित आहे.
चुकार मानवास शिक्षा, दंड –न्यायदान उदंड, उदंड !

जिव्हे, घे देवाशपथ – हजर कर हक्काचा दस्त,
निरभ्र डोळियां पाहणे – निर्मळ कान्हुली ऐकणे,
जो कां रंजला गांजला – त्यासि म्हणोनि आपुला,
न्याय त्वरे सुलभ केला – वकिल तोचि ओळखला !

सर्वत्र फुलावी सुख, शांति,
होय ! न्यायाची हीच परिणति !

तारीख २ एप्रिल ६८. –माधव ताम्हनकर.

[बी. ए., एल्एल्. बी. एम्. एड्. यानी कायदेविषयक सुबोध लेख सुमारे ३०–३५ लिहिले. लघुकथा, स्फुटलेखन, कविता अशा स्वरुपाचे मिळून शेकड्यावर लिखाण केले.]

श्री. पी. बी. शिरवळकर यानी 'किल्ले विशाळगड' हा लिहिलेला संशोधनात्मक ग्रंथ भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रकाशित केला.

श्री. मा. कृ. ताम्हनकर यानी कायदेविषयक सुबोध लेख सुमारे ३०।३५ लिहिले. लघुकथा, स्फुटलेखन, कविता अशा स्वरुपाचे मिळून शेकडयावर लिखाण केले.

श्री. आर. बी. इंगळे यानी 'झडप' या नावचे शिकारविषयक पुस्तक लिहिले. किर्लोस्कर मासिकातून अनेक लघुकथा लिहिल्या.

श्री. डी. डी. वर्धमाने यानी आंतरराष्ट्रीय कायदा या-विषयक व इतर विविध विषयावर इंग्रजी व मराठीतून विचारप्रक्षोभक व बहुमोल असे स्फुटलेखन केले आहे.

श्री. जी. आर. हळदीकर व श्री. जी. व्ही. चिखलीकर यांचे साहित्यविषयी त्यानी या स्मरणिकेत लिहिलेल्या लेखाचे संदर्भात उल्लेख आलेलाच आहे.

श्री. बाबा कदम ( सध्या सोलापुरला असलेले ) यानी दोन कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

## अध्यापन

विद्यादानाचे पवित्र कार्य आमच्यातील बरीच प्रमुख मंडळी विनावेतन करीत आहेत. श्री. एस्. व्ही. आपटे हे सुमारे १५ वर्षे येथील लॉ कॉलेजमध्यें प्राध्यापक होते. अखेर ६–७ वर्षे ते तेथील प्राचार्य होते. त्यांच्यानंतर सध्या श्री. एन्. ए. नांद्रेकर हे प्राचार्य आहेत. पूर्वी ते प्राध्यापक होतेच. त्याचप्रमाणें एम्. व्ही. धर्माधिकारी, एस्. आर. पोतनीस, जी. एन्. गबाळे, व्ही. पी. पाटील, एम्. एस्. बावडेकर, दिगंबर एन्. सरलष्कर हेहि लॉ कॉलेजमध्ये शिकवीत आहेत.

श्री. डी. डी. वर्धमाने हे कॉमर्स कॉलेजात तर श्री. एम्. के. ताम्हनकर हे देवचंद कॉलेज अर्जूननगर येथे part time प्राध्यापक म्हणून शिकवितात.

## विविध विषयाचे छंद

याखेरीज अनेक विषयाचा छंद व नाद करणारी वकील मंडळी आमच्यात काही कमी नाहीत. या संदर्भात सर्वश्री करमरकर, हेब्बाळकर ( चित्रकला ), पुराणिक, महेकर, लाटकर ( संगीत ), केशवराव किंकर (नाट्याभिनय), इंदुलकर, इंगळे, सूर्यवंशी ( क्रीडा ) वगैरेंचा उल्लेख करावा लागेल.

ही यादी आणखी अशीच वाढविता येईल. आम्हाला एवढेच म्हणायचे आहे की, वकिलीच्या धंद्यात प्राविण्य व कर्तबगारी दाखवून, नेटाने व नेकीनें धंदा करणारे आमचे वकील हे केवळ एकांगी व नीरस जीवन जगत नाहीत. त्यांच्या जीवनाला वरील विविधतेचे पैलू आहेत.

### रुचिपालट

कोल्हापुरात नवीनच नेमणूक झालेल्या एका हुशार कोर्टापुढे वटहुकूमासंबंधी काही तक्रारी चालू होत्या. त्यातील एक महत्वाचा मुद्दा कोर्टाच्या लक्षात येईना असे दिसल्यावरून वकील म्हणाले 'साहेब हा कायदा कळायला तसा कठिणच आहे !

'म्हणून मी म्हणतो' कोर्ट मध्येच म्हणाले 'की मला तो जरा समजून सांगा.'

'नाही साहेब' वकील फट्कन बोलले 'तो समजून सांगितला तरीहि तुम्हाला कळणार नाही.'

* * *

सरसुभे शिरगावकर यांच्यापुढे एक मुलकी काम चालवायला बॅ. जयकर आले होते. उलट बाजूस पंगू वकील होते. बॅ. जयकर म्हणत होते की the whole document should be considered ..... the document must be read as a whole ...... या प्रमाणे बॅ. जयकरांच्या तक्रारीत whole हा शब्द वरचेवर येत होता. त्यावर पंगूनी काही समर्पक आधार दाखवून उत्तर दिले की करारातील एखादी शर्थ हीच सर्व कागदाचा गाभा ठरून ती सर्व कराराला बाजूस सारते.

यावर कोर्ट शिरगावकर मध्येच उद्गारले 'Mr. Jaykar, just see, Mr. Pangu has found out a hole in your whole' आणि सर्व कोर्टात एकदम हंशा पिकला.

आघाडीवर असलेल्या या व इतर वकील मंडळींनी वकिलीची प्रतिष्ठा व न्यायाची बूज कटाक्षाने राखली व काहीं आदर्श परंपराहि निर्माण केल्या हेहि अभिमानाने नमूद करून ठेवणे आगत्याचे आहे.

# ४

## निवृत्त झालेले वकील

आमच्या सध्याच्या वकील वर्गाबद्दल लिहिताना त्यांच्या वकिलीविषयी आम्ही लिहिणार नाही हे बंधन घालून घेतल्याचा उल्लेख सुरवातीस केलाच आहे. त्यास एक अपवाद केला आहे तो म्हणजे धंद्यातून जे बरेच वर्षापासून निवृत्त झाले आहेत त्यांच्यासंबंधी फक्त.

या संदर्भात प्रथमत: श्री. कृष्णाजी अप्पाजी उर्फ आबा–साहेब पोतनीस यांचा उल्लेख करीत आहे. कोल्हापूरची स्टेट प्लीडर्स परिक्षा देऊन यांनी १९०१ पासून वकिलीस सुरवात केली व १९४६ चे सुमारास ते निवृत्त झाले. ते बहुधा अव्वल कोर्टातच काम करीत. त्यांची स्मरणशक्ति फार चांगली त्या कारणाने एकादा कागद वाचला किंवा पुरावा ऐकला म्हणजे त्याकडे त्याना पुन: क्वचितच पहावे लागले. त्यांचेकडे कामाची गर्दी इतकी असे की त्यांचा स्वत:चा कोर्टाप्रमाणे रोजचा बोर्ड तयार होई. त्यानी पैशाकरिता कोणाला विन्मुख पाठविले नाही. या कारणाने श्रीमंतापेक्षा गरीब पक्षकार त्यांचे पुष्कळ होऊन गेले.

श्री. शंकर गोपाळ दाभोळकर यानी अॅडव्होकेट O. S. होऊन १९२४ ला वकिलीस सुरवात केली.मराठी व इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व चांगले आहे. त्यांच्या धिप्पाड शरीरास साजेसे त्यांचेकडे कामहि प्रचंड असे. इतके की त्या कामाचा पसारा सांभाळवयास तीन चार मदतनीस ते नेहमी घेत. त्याचप्रमाणे सार्वजनिक कामाचाहि व्याप फार मोठा. लोकल बोर्ड,म्युनिसि-पाल्टिी, बँका, सोसायटचा, अशा अनेकविध संस्थेचे ते अध्यक्ष होते. विविध वाचनाची त्यांना गोडी असल्याने ते बहुश्रुत आहेत. रोटरीचे गव्हर्नर म्हणून अमेरिकेस जाऊन आले. १९४४ साली ते लॉ कॉलेजचे प्राचार्य झाले त्यावेळी त्यानी वकिली सोडली. १९५९ पर्यंत म्हणजे १५ वर्षे ते प्राचार्य होते.

विश्वनाथ तुकाराम पाटील यानी वकिलीस १९२९ ला सुरवात केली व १९५२ चे सुमारास ते निवृत्त झाले. बुद्धीमान, बतुर आणि कर्तबगार वकील असे ते होते. शिवाय मराठा समाजाचे नेतृत्व त्याना साहजिकच मिळाले. तेव्हा अल्पा–वधीतच त्यानी विपुल पण दर्जाचे असे प्रॅक्टीस मिळविले व धंद्यात लौकिक मिळविला. १९५० साली ते बार असोशिएशनचे अध्यक्ष होते. पण त्यांचा ओढा सामाजिक अधिकतर शैक्ष–णिक कार्याकडे असल्याने आपल्या आवडीच्या कार्याला त्यानी जे वाहून घेतले ते आजपर्यंत. प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसा-यटीची स्थापना करून त्यांनी ठिकठिकाणी शाळा कॉलेजिस काढली. गारगोटीच्या मौनी विद्यापीठाचे ते संस्थापक व आजीव अध्यक्ष आहेत. तसेच ताराराणी विद्यापीठाचे ते संस्थापक व आजीव अध्यक्ष आहेत. नगरपालिका व जिल्हा लोकल बोर्ड यांचे ते कित्येक वर्षे सतत अध्यक्ष होते. कॉंग्रेस तिकिटावर ते मुंबई विधान सभेवर एकदा व दिल्लीच्या लोकसभेवर एकदा निवडून आले. 'पुढारी' वर्तमानपत्राचे ते संस्थापक होत. कोल्हापुरांत स्त्री शिक्षणाचे महनीय काम यानी केले आहे.

श्री. दत्तात्रय नारायण सरलष्कर व बळवंत आत्माराम उर्फ हरीभाऊ काशीकर या वयोवृद्ध वकीलद्वयांचा अनुक्रमे दिवाणी व फौजदारी शाखेकडील यशस्वी वकील म्हणून उल्लेख केला पाहिजे. दोघानाहि त्यांच्या भरभराटीचे काळी आप-आपल्या शाखेचे भरपूर प्रॅक्टीस होते. श्री. सरलष्कर हे बार असोशिएशनचे सलग कित्येक वर्षे अध्यक्ष होते.

* * *

सध्या जे प्रत्यक्ष वकिलीच्या धंद्यात आहेत त्यांच्या वकिलीसंबंधी न लिहिता त्यानी वकिलीची चाकोरी सोडून ज्या विविध क्षेत्रात संचार करून कामगिरी केली त्याचाच तेवढा उल्लेख करू असे आम्ही सुरवातीस म्हटले आहे आणि त्याची कारणेहि दिली आहेत. शिवाय 'A lawyer without history or literature is a mechanic, a mere working meson; if he possesses some know-ledge of these he may venture to call him-self an architect' या स्कॉटच्या उक्तीने आमचे धोर-णाचे समर्थनहि होते.

## राजकीय चळवळी

या शतकाचे सुरवातीस 'लोकप्रतिनिधी' ही सभा स्थापून राजकीय चळवळीचे बीजारोपण करण्यात वकिलानी कसा भाग घेतला होता हे आपण पाहिलेच आहे. दरम्यानचे कालात वकिलानी अशा चळवळीत भाग घेतला नाही. तथापि म. गांधीनी सत्याग्रह मोहिम सुरू करून देशव्यापी आंदोलन कॉंग्रेसमार्फत सुरू केल्यानंतर त्याच स्वरुपाची चळवळ संस्थानां-तून सुरू होणे अपरिहार्यच होते. मात्र संस्थानातून ती चळवळ कॉंग्रेसचे ऐवजी 'प्रजा परिषद' या नावाखाली सुरू झाली. त्या चळवळीमध्ये ज्या वकिलानी भाग घेतला त्यात श्री. म. द. उर्फ आण्णासाहेब श्रेष्टी वकील यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. तो गौरवानेहि केला पाहिजे अशासाठी की त्यावेळी कॉंग्रेस ही सत्ताधारी संस्था नव्हती. अर्थात त्या चळवळीमध्ये पडणाऱ्यांचे डोळचापुढें कसलेहि विलोभन नव्हते. उलट त्याग व देहदंड सोसण्याची तयारीच ठेवावी लागे.

समाजाच्या चळवळीत ते होते. नंतर १९३९ पासून प्रजा परिषदेच्या आंदोलनात शिरले. याप्रीत्यर्थ त्यानी कारावास सोसला व स्वार्थत्याग केला. पुढे कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला तो अखेरपर्यंत टिकला. ते म्यु. अध्यक्ष होते. शिरोळ तालुक्यातून मुंबईच्या विधानसभेवर निवडून आले. ( मृत्यू १९६७ )

**कृष्णाजी अनंत ताम्हनकर,** बी. ए., एल्एल्. बी. यानी वकिलीस प्रारंभ १९१० चे सुमारास केला. थोड्याच वर्षानंतर ते दरबारच्या स्पेशल ड्यूटीवर सल्लागार म्हणून बाहेर गेले होते व स्पेशल जज्ज म्हणूनहि त्यानी काम केले. त्यानी अधिकतर दिवाणी काम केले. हायकोर्ट स्थापनेपासून (१९३१) पुढील १५ वर्षे हा काल त्यांचा अत्यंत वैभवाचा होय. त्यावेळी त्यांची बरोबरी करणारा प्रतिस्पर्धी कोणी दुसरा नव्हता म्हटले तरी चालेल. या कारणाने सर्व महत्वाच्या अपीलात एक बाजू हमेश त्यांच्याकड असे. त्यांचे कायद्याचे वाचन फार सखोल व सांगोपांग असे. वकिलीच्या पेशाखेरीज त्यानी इतर कसलाहि व्याप अगर छंद केला नाही. व्यसन एकच होते ते म्हणजे लॉ रिपोर्टस् वाचणे आणि त्यात रंगून जाणे. वकिलीच्या धंद्यावर इतकी अव्यभिचारी भक्ति करणारी व्यक्ति कोल्हापुरातच काय पण इतरत्रहि क्वचितच आढळेल. ते १४–१०–५० ला वारले.

अलिकडच्या काळातील लोकप्रिय व एक आघाडीवरील वकील म्हणून **वामन दत्तात्रय उर्फ बापूसाहेब अडके,** बी.ए., एल्एल्. बी. यांचा उल्लेख करावा लागेल. १९३० चे सुमारास त्यानी वकिली सुरू केली. दिवाणी व फौजदारी आणि मुलकी कामेसुद्धा त्यानी फार कर्तबगारीने चालविली. ते कांही वर्षे सरकारी वकील होते. अनेक वर्षे लॉ कॉलेजचे प्राध्यापक व पुणें विद्यापीठ व नंतर शिवाजी विद्यापीठ येथे डीन ऑफ लॉ फॅकल्टी म्हणून होते. एक वर्ष बार असोसिएशनचे प्रेसिडेंट होते. सार्वजनिक कामाची त्यांना हौस होती. या कारणाने अनेक संस्थांशी त्यांचा संबंध आला. त्यांचा मित्रपरिवार व लोकसंग्रह मोठा होता. ( मृत्यू २१–९–६६ )

आतापर्यंत विशेषत: अपील व वरिष्ठ कोर्टातून काम करणाऱ्या वकिलांचा थोडक्यात परामर्ष घेतला. पण काही कर्तबगार लोकांनी आपले प्रॅक्टिस अव्वल कोर्टापुरते अधिकतर मर्यादित केले होते. त्यामध्ये व मागील पिढीतील प्रसिद्ध म्हणून **भाऊराव पोतनीस** व **नारायण विसाजी रानडे** यांचा उल्लेख करावा लागेल. **रामकृष्णपंत कोडोलकर, बंडोपंत रानडे,** ही अव्वल कोर्टातील आणखी नावाजलेली मंडळी होत. या मंडळींनी अपील कोर्टात कामे केली असती तर ती तेथील मंडळींच्या तोडीची ठरली असती.

हे समालोचन आणखी वाढविता येण्यासारखे आहे. कारण या यादीमध्ये बसू शकतील असे आणखी काही वकील होऊन गेले याची आम्हास जाणीव आहे. तथापि आम्ही जो खुलासा सुरवातीस केला आहे त्या धोरणाने येथेच थांबणे इष्ट होय.

विलीनीकरणापूर्वी वकिलाविषयी एकंदरीनें विचार करता त्यामध्ये बहुसंख्य सनदी वकील असले तरी जे काही पदवीधर होते त्यापैकी काहींचा दर्जा फार वरचा होता हे निःसंशय होय. पण आमच्या वकिलांनी बाहेरच्या कोर्टातून जाऊन वकिली करण्याची त्याना आवश्यकता वाटली नाही अगर हिम्मत बाळगली नाही म्हणून असो किंवा आमच्या संस्थानकडे राजकीय व सामाजिक परिस्थितीमुळे दूषित नजरेनें पाहिले जात असल्याने त्याचींच झळ आमच्या वकिलांना पोचली असेल म्हणून असो आमच्या वकिलांची प्रसिद्धी इतर शेजारच्या जिल्हयातील काही शेलक्या वकिलाप्रमाणे झाली नाही ही वस्तुस्थिति कबूल केली पाहिजे. उलट शेजारच्या जिल्हयातील नामवंत वकील मंडळी मात्र आमच्याकडे येण्याचा पायंडा पडला. ते कसेही असो एक गोष्ट अगदी निःसंकोचपणाने व तिऱ्हाईत नजरेने आम्ही म्हणू कीं राशिंगकर, पंगू, आपटे, ताम्हनकर प्रभृति आमची काही मंडळी इतक्या श्रेष्ट दर्जाची होती की मुंबई प्रांतातील प्रथम श्रेणीमधील वकिलातच त्यांची गणना करावी लागेल. तसेच


रुचिपालट

## कमिशन्चा मोह

कमिशन्वर जागा पाहायला एकंदरीनें कोर्ट नाखुष असते असा आपला अनुभव आहे. पण कोल्हापुरात संस्थानी अमदानीत एक काळ असा होता की कमिशन्चा अर्ज कोर्टाकडून झटकन् मंजूर होई. एकतर अशा कमिशन्करता अर्जदाराला कमिशन् भत्ता भरावा लागे तो कोर्टाच्या पगाराच्या काही विशिष्ट प्रमाणात घेतला जाई व तो खुद्द कोर्टालाच मिळे. कोर्टाकरताच काय पण त्यांचेबरोबर येणाऱ्या शिरस्तेदाराकरताहि भत्ता भरावा लागे. शिवाय कोर्ट जागा पाहायला येणार म्हटले की तेथील सरभराई भरचक्क असायची. कारण स्वस्ताई भरपूर व अन्नधान्याची सुबत्ता. त्यातून शहराबाहेर कमिशन् असले म्हणजे त्याला पिक्निक् पार्टीचेच स्वरूप येई. मग कमिशन्च्या प्रकारात सगळयानाच उत्सुकता वाटली तर नवल नव्हते.

ओघानेच कमिशन्च्या अर्जाचा प्रकार इजमेंटसारख्या दाव्यापुरताच मर्यादित न राहता त्याची व्याप्ति वाढत गेली. एकाद्या करारपत्रावरील दाव्यातसुद्धा 'करारपत्राची वाटाघाट कोठे झाली हे कोर्टानी पाहिले असता पुरावा समजणेस मदत होईल' असे कारण देण्यात येऊ लागले. एकदा तर दरम्यानच्या उत्पन्नाच्या प्रश्नाचे कारणाकरिता अपील कोर्टहि समारंभपूर्वक कमिशन्चे दाव्याची जमीन पाहायला गेले. त्यावेळी कसले जमिनीत पीकहि पण नव्हते हे आणखी एक वैशिष्टच होय.

# न्या. चैनानी [ चीफ् जस्टिस् ] यांची कोल्हापूर कोर्टास भेट




चीफ् जस्टिस् यांच्या समवेत वकील-वर्गाचे छायाचित्र.

दिनांक ३ ऑक्टोबर १९६१

# काहीं न्यायाधीश व वकील यांचा मेळावा

१९२८



न्या. सोनटक्के हे हुजूर बेंचवरून निवृत्त झाले त्यावेळचा हा फोटो आहे.
( हा फोटो पूर्वनियोजित नव्हता म्हणून यात फार थोडे वकील सामील झाले आहेत. )

खुर्चीवर बसलेले : ताम्हनकर, पाचलग, गोखले, न्या. चव्हाण, न्या. सोनटक्के, न्या. भोसले, जगन्नाथराव धर्माधिकारी, जनार्दनपंत नागावकर, महे

उभे रांक १ : अण्णा श्रेष्टी, पिंपळगावकर, हळदीकर, सोनटक्के, शिरढोणकर, देशपांडें, आपटे, पं. सोवनी, ई. जे. नागावकर, टिळक, चिंचवाडकर, ( पाठीमागे बाळू शिपा

उभे रांक २ : आळतेकर, सरलष्कर, देवरुखकर, तारळेकर ( कर्मचारी ), ब्रम्हदंडे, श्रेष्टी, शिरोळकर, हातकणंगलेकर, काशीकर.

# जुन्या दप्तरातील शोध व बोध

संकलक : गणेश रंगो हळदीकर
( परिचय पान ८ पहा )

कोल्हापुरच्या न्यायालयातील रेकॉर्डमध्ये सन १८४३ पासूनचे म्हणजे उणेपुरे सव्वाशे वर्षाचे न्यायनिवाडे इत्यादि रेकॉर्ड सापडते ही एक अभिमानाची गोष्ट होय. याखेरीजहि ऐतिहासिक रेकॉर्ड ( मूळ संस्थानकडे असलेले ) हल्लीचे सरकारने जतन करून ठेवले आहे. या स्मरणिकेसाठी हे रेकॉर्ड चाळीत असता काही वैशिष्टचपूर्ण गोष्टी आढळून आल्या त्यांचे संकलन या लेखात केले आहे.

## (१) पहिला निवाडा

१८४३ चा पहिला निवाडा मिळाला तो सारांश रुपाने पुढे देत आहे.

या निवाड्याच्या मथळ्यावर 'श्री हुजूर न्यायाधिश मोर्तब खुद' अशी गोलाकार मोर्तब आहे. त्याचे छायाचित्र वेगळ्या ठिकाणी छापले आहे. त्याचे खाली पुढीलप्रमाणे मजकूर आहे.

" निवाडा पत्र राजमंडळ हुजूर न्यायाधीश कडून सुमासलास अर्बैन मया तैनव अल्लफ शके १७६५. "

" वि।। (विद्यमान) श्रीकराचार्य न्यायाधीश. "

| वादी :– आप्पाजी बिन् उमाजी गवळी वास्तव्य क।। करवीर | प्रतिवादी :– नारायण भा।। दिगंबर भा।। |
|---|---|

## दावा घरजाग्याबद्दल

" या मोकदम्याचे चौकशीस वादी प्र. वादी हजर असून चौकशी सुरू झाली. वादीची अर्जी नि।। १ "तारीखचं २५ माहे मोहरम साल मजकूरची त्यातील हंसील........" वादी व प्र. वादी आणि त्यांचे साक्षीदार घेतल्यानंतर -

## कोर्टाचा निर्णय

" वादीने जागा खरेदी घेतल्याचा पुरावा होत नाही. आणखी असे आहे कीं, जर ती जागा पूर्वी खरेदी घेतली असती, तरी परसात दार पूर्वीचेच असते. दार पूर्वी नव्हते असे वादीने नि. ५ कबूल करून लिहून दिले याजवरून वादीने प्र. वा. याजबरोबर जाग्याविषयी खटला करावयाशी संबंध नाही असे नजरेस येते. शके १७६५ शोभन नाम संवत्सरे वैशाखं शु।। ५ मि. रोज गुरुवार ता. ३ चंद्र माहे रविलांवर रुजु .... श्रीकराचार्य न्यायाधीश.

## (२) पंच निवाडा

भानगडीच्या दाव्यात पंचाच्या मदतीने ठराव केला जाई. उभय पक्षकारातर्फे पांच पांच पंच नेमीत. त्यापैकी एक सरपंच असे. अशा पंच निवाड्याचा एक मासला पुढे दिला आहे.

" वादी :– श्रीपादराव राजगोळीकर व प्र. वा. सुबराव नारायण देशपांडे जलालपूर प्रांत रायबाग या उभयतांचे देणे घेण्याबद्दल खटला पडोन हुजूर न्यायाधिशाकडे आले आणि आपआपसांत पंचायती होऊन राजीनामे (कबुली) देऊन पंचाचे नांवे यादी जाहली त्याजवर मान्यता करून दिल्या ते पंच नांवनिशीबार

बी तपशील.

सरपंच :– गोपाळ हरी करंब्रळीकर

| | |
|---|---|
| १) चिंतामणराव श्रीनिवासराव भिर्डीकर | १) भिकाजी सदाशीव मराठे. हरीपुरकर |
| २) नारो गोविंद नेसरीकर | २) चिंतो नारायण आठवले |
| ३) नरसो अप्पाजी हत्तरवाडकर नि।। नेसरीकर | नि।। गोसावी कणेकर |
| ३ | २ = ५ |

येणेप्रमाणे सरपंच व पंच मिळोन उभयतांची मजकूर कागदपत्री, उभयतां वादी व प्र. वादीस सवाल करून जबाब घेतले त्याजवरून वगैरे चौकशी अंते ठराव सुमासन अर्बेन मया तैन व अलफ.

वादीने आपले येणे प्र. वादीकडून दिल्याप्रमाणे खते प्र. वा. ची दाखविली त्याप्रमाणे प्र.वा. ने कबूल केली ती...

वादी व प्र. वादीनी आपले कागद हजर केले त्याची यादी कलमवार दिली आहे. ती सवाल जबाब घालून कबूल जाहली आहे. शेवटी पंचाचा ठराव जाहला. हप्तेबंदी देऊन

इनामदारांची कुळे सावकारास लावून दिली आहेत. ता. चंद्र १ माहे रज्जब उर्फ अधिक श्रावणमास शु २ शके १७६६ क्रोधीनाम संवत्सरे.

सहृया पंचाच्या.

( ठराव झाल्यानंतर व पंचानी ठराव केल्यानंतर सरपंचाची सही शेवटी असून उभयता वादी प्र. वा. ची मान्यता ठराव पुढीलप्रमाणे असे. )

| | |
|---|---|
| सदरहु फैसला प्रमाण. सुबराव नारायण देशपांडे प्रांत रायबाग. मान्य असो. दस्तूर रामचंद्र कृष्ण नि।। देशपांडे मशार निल्हे. | सदरहु फैसल्ला प्रमाण. श्रीपादराव नरसिंह राजगोळीकर. मान्य असो. द।। तिमाजी व्यंकाजी मु।। नि।। मशार निल्हे राजगोळीकर |

## (३) काम चालविण्याची पद्धत

प्रथम उभय पक्षकारांचा लेखी पुरावा घेत व तो दोन रकाने करून—

| वादीचे कागद | प्र. वा. चे कागद |
|---|---|
| १ | १ |
| २ | २ |

असे कलमवार लिहून उभयतांस लेखी पुरशीस अगर सवाल-जबाब घालून त्यातूनच बरीचशी माहिती घेतली जात असे.

नंतर उभयतांस तुमचे साक्षीदार कोण आहेत काय यांची यादी, वादी प्र. वा. कडून घेत. वादी प्र. वादी आपली साक्षीदारांची यादी देत. त्या यादीत त्या साक्षीदारास आणून " पुसावे " असे लिहीत. नंतर साक्षीदारास यादीने ( यालापुढे समान = (समन्स) हा शब्द वापरला आहे. ) बोलावून विचारून त्यांच्या जबान्या निशाणवार घेत. या जबान्या वादी व प्र. वा. च्या देखत घेत, की माघारी घेत, याबद्दल उल्लेख मिळत नाही. बहुधा वादी प्र. वा. च्या गैरहजेरीतच घेत असावेत. कोणाचेही दडपण न पडता साक्षीदार आपणास माहित असेल तेवढेच सांगे. सरतपास, उलटतपास, फेरतपास ही वकिलीपद्धत नव्हती. कारण वकीलच कोणी नसत.

## (४) अधिकाराचा खलिता (दिवाणी)

जहागीरदाराप्रमाणे कांही दुमालदारानाहि फौजदारी दिवाणी कामे चालविणेचे अधिकार दिले जात. एका दुमालदाराना असे अधिकार देताना कॅप्टन **ग्रॅहॅम** पोलिटिकल–सुपरिंटेंडेंट, प्रांत कोल्हापूर यांनी जी भाषा वापरली आहे ती अनेक दृष्टीने उद्बोधक वाटेल. दिवाणी कामे चालविण्याचे अधिकार देताना लिहिलेल्या यादीत म्हटले आहे की, "......आपले नि।। गांवचे राहाणारे लोकावरील दिवाणी खटले पांच हजार रुपयांचे आंत असतील ते वाजवी रितीने व निःपक्षपाताने परस्पर फैसल करण्याचा अखत्यार आपणांस देण्यात आला आहे. अशास एकदंर दर महिन्यांत खटले फैसल होतील व महिना अखेर शिल्लक राहांतील त्यांची पत्रके यादी सोबत नमुने पाठविले आहेत त्याप्रमाणें दरमहाचे दर महिनाअखेर पुढील महिन्याचे दहावे तारखेचे आंत हुजूरास येत असावे. सदरहु अखत्यार जोपर्यंत चांगले व सरळरीतीने वहिवाट चालेल तोपर्यंत आपले हाती राहाण्याचे जाणोन असावे. न्याय अन्याय पाहोन करणे करतील अशी इकडील उमेद आहे. आपले फैसल्यावर तीस दिवसांचे आंत कोणी अपील केल्यास आमचे हुजूर चौकशी होईल. सदर अपील करणारांस फी पडेल. त्याचे कोष्टक ३ चे यादी समवेत पाठविले आहे. ही फी अपील फिर्यादिने हुजूर खजिन्यांत दिली म्हणजे त्यास दाखले मिळतील पैकी एक दाखला त्याने आपलेकडेस ठेऊन अपील अर्जीबरोबर ..........कोष्टक फीचा जाहीरनामा तयार करावा. ......प्रसंगी कारण पडल्यास एखादा अव्वल खटलाही पहावयास मागणेत आला व गैर इन्साफ झाला असल्यास असा फैसल्ला रद्द करणे हा अखत्यार इकडेस आ कळावे २० सप्टेंबर १८४८ इ।।.

## (५) अधिकाराचा खलिता (फौजदारी)

फौजदारी अधिकार देताना अधिक विस्तृत सूच दिल्या गेल्या आहेत. त्याचा नमुना पहा.

आपले ताबेत गांवे आहेत. त्या गांवगन्ना निहाय फौ दारी प्रकरणांत तंटा होईल त्यांचा इन्साफ आपणांकडे हो गुन्हयाचे स्वरुपानुरुप शिक्षा देण्यांत येत असावी त्याचा प्र खाली लिहिल्या प्रमाणे :-

जबरी मारामारी:– दरवडे, खून, अकल्पीत बुद्धीपुरस

१) एकूण चार गुन्हे खेरीज करून व बा गुन्हयाचा इन्साफ आपलेकडे चालून त्याजबद्दल शिक्षेचा ठरा ५० रुपये दंड व ३ महिने कैद येथ पावेतो होत असा यावर जास्त ठराव आपणांकडून होऊ नये. सदर चारी गु इकडे आहेत. त्याचा इन्साफ आपणाकडे व्हावयाचा ना परंतू गुन्हा जाहाला असतां तात्काळ कैदीस पकडण्याची मुद्दा धरण्यांची वगैरे तजवीज आपणाकडून होत असा त्याजविषयी लागलीच इकडे येत असावे. म्हणजे कल होत होईल.

२) जे खटले आपलेकडे येत जांतील एक फाईल घालून त्याजवर सर्व खटले म्हणजे फिर्यादीच्या अर्जी या तारीखवार होत असावे व त्यापैकी फैसले किती जाहले शिल्लक किती राहीले त्याजबद्दल दर महिन्यास नमुने या समागमे पाठविले आहेत. त्याप्रमाणे पत्रके तयार हो दुसरे महिन्याचे १० तारखेचे आंत इकडे येऊन पोचत अ पाठविण्याची तजवीज होत गेली पाहीजे.

३) सदरहु फौजदारी अंमल आपलेकडून चांगलेरिती चालून सरळ वर्तणूक आल्यास असाच चालेल. तसे

जहालेतर हा अखत्यार काढून घेतला जाईल व आपण फैसल्ला कराल त्यावर अपील पहाणे इकडे होईल व प्रसंगोपांत जरूर लागल्यास जे खटले आपल्याकडे फैसल व्हावयाचे त्यातून एखादा खटला इकडे पाहाण्यास मागितला जाईल.

४) सदरी ३ महिने कैद व (५०) पन्नास रु. दंड न पावेतो शिक्षाविषयी लिहीले आहे. परंतू एखादा भारी स्वरुपाचा खटला दिसल्यास त्याचा फैसल्ला इकडे लिहून येत असावा व परभारे होत जाऊ नये.

## (६) आणखी एका दाव्याचा नमुना

अवल नंबर २४७ / १८४८ मधील ही वादीची फिर्याद अर्जी प्रथम पहा. अर्जी 'यादी' या शब्दाने सुरू होत आहे. ती कोणत्याहि तांत्रिक पद्धतीने लिहली नसून साध्या व्याव-हारिक पद्धतीने लिहिली आहे असे आढळेल.

"हुजूर सदर आमीन कोडत केरली सरकार करवीर.

"यादी रघुनाथ शास्त्री कात्यायने राहणार करवीर सुमातिसा आरबैन मया तैन व आल्लफ. पूर्वी भाऊ नाईक हे आमचे घरी भाडेने राहत होते. त्याणी आमचे भाड्याचा पैसा देणे. त्यासी आम्ही त्याची खाते बाकी देणे होती. त्यात वजावाट करून बाकी शके १७६८ पावेतो पूज्य जाहली. नंतर ते मयत जाहले. पुढे त्यांचे चिरंजीव आबाजी लक्ष्मण यासी आम्ही भाडें मागों लागलों. त्यावेळेस देतो असें सांगून भाडें न देता दुसरें घर पाहोन आमचे भाडें निभावेना सबब निघोन गेले. त्याचे चुलते भास्कर आपाजी काळे याणी आमचे माडीस कुलुप घातले. तेही एक दोन रोजांत काढतो म्हणून सांगून दिवस गेले. आतां कुलुप काढणेविसी सांगितलेस काढीत नाहीं. यासी आमची माडी खाली जाहली नाहीं. त्यासी माडी आंगणी चार. याचा दावा रुपये वीसची फिर्याद केली आहे. तरी कोडतानी प्र॥ भास्कर आपाजी काळे यासी आणून चौकशी होऊन माडीचें कुलुप काढून देवणे सरकाराकडे आहे. हल्ली त्या इमलेस घुशीचा उपद्रव होऊन खराबी होत आहे मिती पौष शु. ३, शके १७७०."

ही फिर्याद अर्जी ता. २८-१२-४८ ला दाखल झाली. ताबडतोब विरुद्ध बाजूला समज गेलेली दिसते. कारण "सदरहूची नक्कल आम्ही घेतली याचा जबाब आजपासून दोन रोजात देतो" असा शेरा प्र. वा. ने दुसरेच दिवशी ता. २९-१२-४८ ला आपल्या सहीनिशी केला आहे.

या नंतर प्र. वा. चा 'जाब' नि. २ ला दाखल झाला त्याचा नमुना पहा.

वादीने आम्हावर सदर दावा माडीबद्दल करून फिर्याद केली. त्यास जबाब.

"भाड्याने घर आम्हाकडे होते असा वादीपासी काय दस्ताऐवज असेल तो काढून दाखवावा. वादीनेच आम्ही शिरोळ पेटचास असताना मागें आमची माणसे बाहेर घाल-विली असे असोन भाडे देणे निभावेना सबब दुसरे घर पाहून हे घर सोडून गेल्याचें लिहीतो त्यास मुळीच आम्ही वादीचे घरात भाड्यानें राहात नव्हतो. वादीकडे आमचे ४३८ रुपये येणे. त्यांत माडी घर सुद्धा वीस वर्षे सुमारे आमचे ताब्यांत आहे. आमची बाकी दिली म्हणजे वादीचे घर माडीसुद्धा देणेस कबुल आहो. आम्हाकडोन हरकत नाही."

मग त्यावर ठराव झाला त्याचाहि नमुना पाहण्यासारखा आहे.

"या कजाची सर्व हकीकत मनास आणितां प्र. वा. ने दाव्याची जागा आपलेकडे गहाण असल्याबद्दल जमाखर्चाच्या वहया हजर केल्या त्यास घर घाणाचा दाखला लिहिलेले दाखविले तें पहातां खाडाखोड करून लिहिल्यासारखे दिसल्यावरून चौकसी सुरू होऊन त्या कागदपत्रासहीत बनाऊ कागद केल्यामुळे खटला हुजूर न्यायाधीशाकडे चौकशीस पाठविला. तिकडे बनाऊ घर गहाणाचे खरे लिहिल्यास प्र. वादी कबूल होऊन शिक्षा पावल्यानंतर खटला न्यायाधीशाकडून परत आला. त्यात प्र. वादी हे ... नि ४ चे जबानीत वही सिवाय गाहाणाचा आधार नाही म्हणोन लिहित असल्यावरून दाव्याची जागा वादीची खाली करून देणे भाग असल्याप्रमाणें ठराव केला असे. वादीकडे प्र. वादीचे येणे असल्यास अलाहिदा दावा होण्यास हा निवाडा अटकाव करीत नाही. दाव्याचा खर्च फी ३॥ व समान (समन्स) भा ८= मिळोन ३॥= प्र. वा. चे सिरावर म्हणोंन ठराव केला असे. ता. व सन मजकूर (६ मार्च १८४९)

कागदांचा तपशील

| | |
|---|---|
| १. वादीची अर्जी | २. प्र. वा. चा जाब (कैफियत) |
| ३. प्र. वा. केलेले समान | ४. प्र. वा. ची जबानी |
| ५. इन्साफाची नोटीस | ६. प्र.वा.चे भावास समान केलेले |
| ७. प्र. वा. ने वहीवर खोटा जमाखर्च केला त्याब॥ पंचनामा | ८. प्र. वा. चे भावाची जबानी |
| ९. प्र. वा. चे पुतणे यासी समान केलेले | ९ |

येणेप्रमाणे कागद दाखल केले असे ते ता. व सन मजकूर.

(**बाळाजी विश्वनाथ गोखले**) सदर अमीन

| | |
|---|---|
| फी जमा वादीकडून कीर्द पान ४१२४ याजवर जमा असे ता. १३ एप्रील सन १८४९ रुपये (३॥) साडेतीन | या निवाड्याची नक्कल वादीनें खुद्द हजर राहून मागितल्यावरून दिली असे ता. १३ एप्रिल सन १८४९ सदर अमीन |
| गणेश सखाराम कारकून | |

या तपशीलावरून काही वैशिष्टये वाचकांच्या ध्यानी येतील. पहिली गोष्ट कोर्टाचे ठिकाण केरली घातले आहे. म्हणजे मामलेदाराचे कोर्ट तेथे असले पाहिजे असे दिसते. प्र. वा. नी दोन दिवसात जबाब दिला. प्र. वा. च्या वहयाबद्दल शंका आल्याने पंचनामा झाला. कज्जाचा निकाल दोन महि-न्याचे आसपासच झाला. नक्कलहि प्र. वा. ला. सत्वर मिळाली. तात्पर्य सर्वच कारभार फार झटपट आणि थोडक्या शब्दात होत होता. आणि तो सुद्धा अत्यंत माफक खर्चात. मग 'इयर ओल्ड', 'टार्जेट' वगैरे निकड लावण्याचे शब्द वापरण्याचा प्रश्न उरत नव्हता.

# SHAHAJI LAW COLLEGE, KOLHAPUR.

**N. A. Nandrekar,** Advocate,
Principal, Shahaji Law College.

The relations of the Bench and the Bar of Kolhapur to the Shahaji Law College are so close and inseparable, that without reference to the brief history of the College this Souvenir will surely remain incomplete.

His Highness, the late Shri Rajaram Chatrapati Maharaja of Kolhapur, who was always very keen, in matters of educational facilities at Kolhapur, found that there was no institution imparting legal education so essential in the country, in a very large tract of the then Bombay Presidency extending from Poona to Mysore. So in December 1932, he appointed a committee under the chairmanship of Rao Bahaddur A. B. Chougule, the Chief Justice of Kolhapur High Court to formulate a scheme and to submit a report in this respect.

The scheme was prepared and submitted to His Highness by the Committee and it was sanctioned enthusiastically by His Highness, although it involved a huge budget of Rs. 29,000 for the first year.

Necessary sanctions for affiliation ete. of the University of Bombay and the Government of Bombay were obtained in a very short time. This was due to the appreciation felt by the various members of the University and Government of Bombay for His Highness's sincere, cosmopolitan and large hearted love for the cause of education.

The success of the scheme was also contributed to by the readiness with which, not only lawyers of well known standing in Kolhapur but reputed lawyers from the then British India as well, came out with offers of their able service, in the cause of the College.

The question of management of the College was also immediately solved. His Highness had decided to have an experiment in the decentralisation of control of higher education by the State and the first step in that direction was taken in the case of this Law College. By notification No. 52 of 1933 in the State Gazatte, His Highness had declared that " The Council of Legal Education, Kolhapur ", a body corporate, capable of holding property, consisting of sevan ex-officio and elected members, be formed to manage the Law College. This Council was to control the general management of the College, the internal management of the College, however, was entirely left to the Principal and Professors of the College.

The following gentlemen were appointed the first Principal and Professors of the College :

1. Shri **S. K. Kelavkar.** B.A.,LL.B. (Cant.) Barrister-at-Law. — Principal
2. ,, **K. N. Pandit**, B.A.,LL.B. — Professor
3. ,, **R. P. Karandikar**, Advocate ( O. S. ) — ,,
4. ,, **V. R. Karandikar**, M.A.(Edin) Bar-at-Law — ,,
5. ,, **S. G. Dabholkar**, B.A.,LL.B. Advocate ( O. S. ) — ,,
6. ,, **G. H. Kelkar**, M.A.,LL.B. — ,,
7. ,, **B. K. Dalavi**, B.A.,LL.B. — ,,
8. ,, **K. R. Apte**, B.A.,LL.B. — ,,
9. ,, **S. P. Savant**, M.A.,LL.B. — ,,
10. ,, **Y. G. Sowani**, B.A ,LL.B. — ,,

Thus the management of the Law College combined the best elements of democratic management, with the guiding control of a benevolent monarchy.

9. Shri **D. N. Sarlashkar**

10. „ **M. V. Dharmadhikari**

11. „ **N. A. Nandrekar** ( who is working as Principal at present )

12. „ **S. R. Potnis**

13. „ **V. P. Patil**

14. „ **G. N. Gabale**

15. „ **M. S. Bavadekar**

16. „ **V. D. Jadhav** ( Sangli Bar )

This College has the credit of producing a number of Law graduates who have occupied a very high position in life. It would not be out of place if the names of some of them are enumerated here :

1. Shri **R. B. Naik** M.A.,LL.M. District Judge ( now retired and working as Principal, Law College, Shimoga )

2. Justice **M. S. Apte**, High Court of Bombay.

3. Shri **R. K. Joshi**. District Judge, Poona.

4. „ **R. K. Ranade**, Retired District Judge. ( who took LL.M. degree as a student of this College )

5. „ **T. R. Kulkarni**, District Judge, Sholapur

6. „ **P. B. Salunke**, Member of the Revenue Tribunal Maharashtra State

7. Shri **Anandrao Chavan**, Minister for Rehabilitation ete. Government of India.

8. „ **Balasaheb Desai**, Revenue Minister, Maharashtra State.

9. „ **B. D. Jatti**, Sometime Chief Minister of Mysore State.

10. „ **S. R. Kanthi**, Sometime Chief Minister of Mysore State.

11. „ **L. M. Patil**, Once a Minister in Bombay Government.

12. „ **N. B. Naik**, District Judge, Sangli.

13. „ **K. R. Pawar**, Industrial Court, Bombay.

Some of the old students of this College are holding very hige position in Army and some are high Police Officers. Many of them are judicial Officers, Public Prosecutors, Govt. Pleaders and social and political workers in Maharashtra and other adjoining states and number of them are eminent Advocates and Lawyers serving the cause of justice very efficiently.

The position of "Council of Legal Education" which runs the Law College is now very sound and efficient. It has started "Commerce College" at Kolhapur- another sister institution- which is also run very efficiently. It has got its own separate decent building worth about five lacs of rupees constructed on some part of the Tophkhana premises imparting commerce education for about eleven hundred students.

This is in short the history of the present "Shahaji Law College, Kolhapur" which is so closely connected with the Kolhapur Judiciary and the Kolhapur Bar.

We take this opportunity to offer our heartfelt felicitations to all the members of the Bar and the Bench of Kolhapur both past and present who have maintained the dignity of the Court during last hundred years.

After a lengthy conference with the estranged husband, the lawyer reported to his client : Mrs. Blake, I have succeeded in making a settlement with your husband that is eminently fair to both of you.

"Fair to both" exploded Mrs. Blake, "I could have done that myself ! what do you think, I hired a lawyer for ?"

* * *

A man appeared in Court seeking a separation from his wife.

"On what grounds ?" asked the Judge.

"On the grounds guaranteed in the Constitution — Freedom from Speech."

The College was opened on 17th June 1933 and inspite of the hurry with which the College had been started and the recognition it then still had to obtain, the response by students was more than expected. His Highness Major Sir Shri Chatrapati Shahaji Maharaj was the first student of this College and the present President of the Council -Shri Ratnappa Kumbhar was also the student of this College in its first year. It is interesting to note that 104 students that joined the College were from about 12 different adjoining districts like Mysore, Belgaum, Ratnagiri, Satara, Bijapur, Sholapur and even from Khanadesh etc. His Highness, Sir Shri Rajaram Chatrapati had indeed laid the public of these parts under a deep debt of gratitude by opening this Law College.

The formal opening ceremony of this College however, took place on 2nd November 1933 at the hands of the Rt. Hon'ble Sir Fredric Hugh Sykes, the then Governer of Bombay. Since then the College was also named as " Sykes Law College, Kolhapur ".

The College was run very efficiently with the help of best staff and the best library which was well furnished, thanks to keen interest taken by Principal Kelavkar. But it is a well established fact that the Law Colleges in mofussil never become self sufficient. Faculty of Law has its own limitations and owing to the limited number of students as compared to Arts, Science and Commerce faculties, it goes difficult to meet out the expenses of the College from the collection of the fees of the students. Such was the case with this College as well; and in 1939 the college was required to be run by the Government of Kolhapur itself instead of " Legal Education Society ". It was so run by the State until its merger.

After merger, the College was run by Bombay State for about two years only and then it declared that the Government intends to close the College. But the enthusiastic citizens of Kolhapur took a lead and revived the old " Council of Legal Education " with a new constitution of its own, on 17th of February 1951. His Highness Sir Shri Chatrapati Shahaji Maharaj was the Patron in Chief and the College was also called after his name as " Shahaji Law College ". Shri Ratnappa Kumbhar was the President and Shri S. G. Dabholkar was the Secretary of the new " Council of Legal Education ".

The Bombay Government had graciously given the Council all the furniture and books belonging to the College and also permitted to use the same old building for the College.

In 1955, the Government of Bombay demanded the building back for the use of Government B. T. College. But at the same time it was pleased to grant the Tophkhana building on long lease on a nominal rent, due to the untiring efforts of the able President of the Council, Shri **Ratnappa Kumbhar**, who happened to be the elected member of the then Parliament of India also.

In 1960, the Government of Bombay, when the present Home Minister of India Shri Yashavantrao Chavan was the Chief Minister of Maharashtra State, due to the sincere efforts of Shri Ratnappa Kumbhar the President of the Council, was pleased to grant the whole Tophkhana building to Council of Legal Education permanently for the noble cause of the Council. Thus the College got its stability owing to its own building and the best library and furniture. But with all this, it is important to note that the College could maintain only two full time Professors. Since 1955, number of able and eminent Lawyers from the Kolhapur Bar came forward to render their part time valuable honorary services as Professors in this Law College. It is a proud privilege of the Kolhapur Bar to supply continuously till today, batches of lawyers as honorary Professors without whose services it would be nearly impossible to run the College. It would be failing in duty if a reference to their names is not made on this occasion.

1 Shri **S. V. Apte** ( who also worked as Principal after Shri S. G. Dabholkar )

2. ,, **M. S. Apte** ( who is appointed as High Court Judge quite recently )

3. ,, **S. R. Kulkarni**

4. ,, **V. K. Bagal**

5. ,, **R. N. Pusalkar**

6 ,, **W. D. Adke**

7. ,, **M. D. Shreshti**

8. ,, **T. R. Kulkarni** ( who is working as District Judge at Sholapur )

# वटहुकमाच्या साम्राज्याची शतसंवत्सरी

**लेखक : ॲड. बाबूराव जोशी**

( लेखक परिचय : पान १५ पहा. )

कोल्हापुरात ज्यानी वकिलीस सुरवात केली किंवा कोल्हापुरात जे न्यायदान करण्याकरता नवीन लोक ( स्थानिक अगर बाहेरून असो ) आले त्या सर्वांना कोणता कूट प्रश्न प्रथम भेडसावत असेल तर तो येथील वटहुकमी इनामी कायद्याचा होय. धंद्याच्या सुरवातीस अशी कामे मी जेव्हा ऐकत बसत होतो तेव्हा कित्येक वर्षे त्या तक्रारींचा नीट प्रकाश पडला नाही. कसा पडणार ? त्यातील नुसते शद्बच पहाना म्हणजे खात्री होईल. वजई, मोहिनी, कदीम, जदीद, खुनकाट, नाववाला, यादास्त, वाजघस्त ... असे एकापेक्षा एक जबरदस्त शद्ब. गडकऱ्यानी गोकुळच्या तोंडी ‘ दरखास्त, हुकूमनामा, फैसल्ला ’ इत्यादि शद्ब घालून जी आमच्या कोर्टातील शद्बाची थट्टा केली त्या गडकऱ्याना आमचे इनामदारी खात्याचे उपरिनिर्दिष्ट शद्ब माहीत नसावेत असे दिसते.

शद्बाप्रमाणे त्या प्रकरणातील तक्रारीहि तितक्याच अनाकलनीय. एकाने म्हणावे ‘ साहेब, इथं शहात्तर त्र्याहत्तर लागू पडत नाही. पस्तीस चारच पहावा लागेल. ’ दुसऱ्याने मांडावे की ‘ हे काही हुजूर सनदी उत्पन्न नव्हे की महाली नव्हे साधे बलुते आहे आणि वाटण्या चव्वेचाळीस तेरा पूर्वीच झाल्या आहेत. ’ केव्हा आम्ही ऐकावे की ‘ सव्वीस आठ चौदा-प्रमाणे ( दि. २६ ऑगस्ट १९१४ असा अर्थ नव्हे बरं. ) विचार करता वादीचे नाव लागायला पाहिजे. ’ तर दुसऱ्यानं त्यावर उत्तर द्यावं की ‘ वादी श्रेष्टाधिकारी असेल पण मोहिनी कुठं भोगतोय. ’

ही गोष्ट आम्हा नवख्यानाच भेडसावीत होती असं नाही. विशेषत: जोपर्यंत वटहुकूमाची पुस्तके छापून झाली नव्हती तोपर्यंत तरी ज्यानी दहाबारा पावसाळे आमच्या कोर्टात काढले त्या वकिलानाहि अशी कामे चालविताना फारसा आत्मविश्वास वाटत नसे. कारण हे वटहुकूम, जाहीर-नामे, अगर सर्क्यूलर हे कधीकाळी गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले असले तरी ते एकत्र ग्रथित केले नसल्याने त्यांचा साकल्याने अभ्यास करण्यास कठिण जाई. विनोद असा होई की वादी वकिलाने आपल्या बासनातून एखादा वटहुकूमी आधार दाखवावा. तर त्यावर प्र. वादी वकिलानी आपल्या भात्यातून मारक वटहुकूम उपसावा. शिवाय मुलकी न्याय देणारे काही अधिकारीसुद्धा तरबेज असत. ते आपल्या दप्तरातून तिसराच आधार काढून उभयपक्षाना चकवीत असेहि कधीकधी व्हावयाचे.

असा गोंधळ व्हावयाचे मुख्य कारण उघड होते. कारण हे सर्व वटहुकूम परिस्थितीनुरूप, एखादे उदाहरण घडले किंवा एखादी अडचण आली अशा कारणाने झाले होते. आणि त्याची शद्बरचना विशिष्ट अशा तज्ञाकडून केली गेली नव्हती म्हणून त्यात अव्याप्ति, अतिव्याप्ति, दुर्बोधता वगैरे दोष राहणे स्वाभाविकच होते. उदाहरणादाखल खालील शब्दरचना पहा :—

‘ ... ... सबब हक्काने या पुढे हल्ली नोकरीवर असणारे इसमाकडे वडील घराण्यात हिस्से झाल्याशिवाय हल्ली त्याजकडे असलेल्या जमिनी चालणेच्या आहेत. ’ पा. ९०१

'मोहिनी, अर्जी, वाढावा अशा जमिनी एकत्र करून वाटण्या जाहल्यामुळे नाववाल्याचे वाटणीस मोहिनी आलेली नसेल तर कसे करावे ? वाटण्या केल्या त्या लोकानी आप–आपले सोयीप्रमाणे केल्या आहेत. त्यांच्या या कृत्यामुळे मोहिनीचा अंश जर एखाद्याकडे राहिला नसेल तर त्यास नाइलाज समजून तो वतनाचा अंश धारण करणारा आहे असे समजावयाचे नाही. ' पा. ९१६–१७

अशातऱ्हेच्या शद्वाने नक्की काय म्हणायचे आहे हे आम्हालाच समजले नाही असे नाही. तर या हुकूमांची नेहमी अम्मलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यानाहि ती अडचण भासत असे. म्हणून वरचेवर शंकेचे रिपोर्ट होत असत व पुढे त्यास अनुसरून नवीन वटहुकूम काढून खुलासे होत. ( पहा वटहुकूम पा. ८७९ ते ८८१; ९०३; ९१०–१२. )

शिवाय वटहूकूम हे काही एकाच प्रकारचे नसत, अगर एकाच अधिकाऱ्याने काढलेले नसत. दिवाण, कारभारी, सरन्यायाधीश, सरसुभे, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट अशा अनेक अधिकाऱ्यानी काढलेले असत. त्यातील कांही कामकाजपद्धतीचे (Procedural) काही कारभारविषयक (administrative) तर काही कायदा म्हणून (Substantive Law) वापरायचे असे होते. पण हा भेदाभेद ज्या त्या वटहुकमात स्पष्ट केलेला नसायचा. संदर्भाने ज्याने त्याने तो समजून घ्यावयाचा होता.

अशा अनेक कारणाने वटहुकमाचे काम म्हटले की, वकिलाना आणि न्यायाधिशाना गोंधळल्यासारखे वाटावे यात आश्चर्य नव्हते. पण जरा खोलात गेले आणि विशेषतः काय धोरणाने अगर तत्वावर हे वटहुकूम अमलात आले अगर त्यात बदल होत गेले याचा विचार केला म्हणजे या वटहुकमांचा अन्वयार्थ लावणे तसे अवघड नव्हते हे दिसून येईल. आणि तसा अन्वयार्थ लावण्याचे दृष्टीकोणातून हा लेख लिहीत आहे. अर्थातच कायद्याच्या तपशीलात शिरायचा प्रयास केलेला नाही आणि अशा ठिकाणी त्याची आवश्यकताहि नाही.

१८४४ साली ज्या वेळी ब्रिटिश सरकारने येथील राज्य व्यवस्था हाती घेतली तेव्हा असे दिसून आले की तऱ्हतऱ्हेच्या देणग्या, वतने, इनामे वगैरे प्रकाराने संस्थानातील २/३ भाग तथाकथित इनामदारांचे भोगवटयास होता. साहजिकच मेजर ग्रॅहॅमचे कारकीर्दीत इनाम चौकशी सुरू झाली. त्यालाच धरून वाजघस्त ( ज्याची मालकी वादग्रस्त अशी ) प्रकरणे निघाली. तेव्हा पहिल्या पंचवीस वर्षात जे वटहुकूम निघाले ते या इनाम चौकशी संबंधीचे होय. यात एका बाजूला इनामधारक तर दुसऱ्या बाजूला सर्व सत्ताधीश सरकार असा मामला असल्याने व सरकारवर दावा करता येत नसल्याने सरकारी धोरणाप्रमाणें हे प्रश्न अधिकाऱ्यानीं निकालात काढले किंवा वाद मिटवण्यासाठीं नजराणा वगैरे भरून पक्षकारानी आपले प्रश्न सोडवून घेतले.

इनामी कायदा जो कोर्टातून खरा रंगला ती प्रकरणे म्हणजे पक्षकार--पक्षकार दरम्यानची होय. आणि ही प्रकरणे ज्वलंत ठरली. त्याला कारण म्हणजे इनामी कायदा हा वारसाचे दृष्टीने व्यक्तिगत कायद्यास ( Personal Law ) जसा विरोधी तसाच तो उपभोगाचे दृष्टीने नेहमीच्या मिळखती-संबंधीच्या कायद्यास ( ordinary Law of the Land ) विरोधी होता म्हणून. याच बाबी आपण क्रमशः पाहू.

## तबदिलीवर मनाई

या बाबतीत पहिला गाजलेला वटहुकूम म्हणजे शहात्तर व्यहात्तर म्हणजे सन १८७३ चा व.नं.७६ हा होय. या हुकूमाने जे सनदी नोकर होते त्यांच्या मिळखती गहाण, खरेदी, वाटणी वगैरेस पात्र नाहीत असे ठरविले. हेतू उघड होतो की या सर्व जमिनी इनाम धारकाना नोकरीचे स्वास्थ्यासंबंधी व नोक मोबदला म्हणून मुळात दिल्या असल्याने नोकरीस ह येऊ नये म्हणून त्या जमिनी नोकरी करणाऱ्याकडेच रा अशी तरतूद करणे हा होय.

वरील धोरण केवळ सनदी जमिनीपुरतेच मया ठेवले असते तर ते वावगे नव्हते. पण तेवढयावर थ नाही. तबदिलीवरील मनाई पुढे महाली हक्कदार खु जमिनीस म्हणजे वतनी जमिनीस वट नं. ३५/१९० करण्यात आली. वास्तविक या पूर्वीच संस्थानात वतन लागू होता. पण तो लागू करताना मखलाशी अशी केली की तो फक्त भावार्थाने ( in spirit ) लागू आ समजणेचे आहे. एखादा कायदा भावार्थाने म्हणजे spirit) लावायचा व तो अक्षरशः (in letter) ला नाही हा प्रकार कायद्याच्या दृष्टीकोणातून आक्षेपा अशी टीका पुढे न्या. माडगावकर यानी या संदर्भात के पाहण्यासारखी आहे. (पहा को. लॉ. रिपोर्टस् पा. ५९). असे केले असल्यानेच तो कायदा रद्द न करताहि वर वि प्रमाणे वटहुकूम करता आला.

इतके झाले तरी वर उल्लेखलेल्या वटहुकमाचे आणि बऱ्याच प्रकारच्या जमिनी सुटत होत्या. तसे हो म्हणून वट नं. ४४/१९१३ व त्याचे पाठोपाठच वट नं.४/ करण्यात आले. या दोन्ही हुकमाने कोणत्याहि प्र इनाम असो ते अविभाज्य व त्यास नोकरी इनामा नियम लागू आहेत असे ठरवून असे इनाम फक्त मुलाकडेच चालविणेचे आहे असेहि फर्मांविण्यात आले.

या वटहुकमानी तर क्रांतीच झाली. कारण एकत देणगी स्वरूपाचे धर्मादाय इनाम या वटहुकमांच्या अशा कक्षेत आले. त्याच्या समर्थनार्थ अशी मल्लीनाथी ण्यात आली की, इनाम स्वीकारणाऱ्याने इनाम देणा

न्यायालयाचे अंतिम सत्ताधीश

# कोल्हापूर संस्थानचे दोन छत्रपति

यांच्या कारकीर्दीत अनेक क्रांतिकारक न्यायालयीन घडामोडी व घटना घडल्या.




छत्रपति श्री शाहू महाराज

१८८४–१९२२




छत्रपति श्री राजाराम महाराज

१९२२–१९४०



सन १८४३ चा पहिला निवाडा रेकॉर्डमध्ये मिळाला त्याच्या सुरवातीच्या पानाचा थोडा भाग.

( अधिक तपशील पान १७ वर पहा. )




न्या. महादेव गोविंद रानडे यांचा उल्लेख असलेल्या फैसलनाम्याचा कांही भाग.

# न्यायालयात वापरले गेलेले विविध शिक्के




कोल्हापूरच्या हायकोर्टचा शिक्का




तीस रुपयाच्या स्टांपाच्या कागदा-
वरील शिक्का सन १८६४ चा.

श्री कारभारी सरकार
करवीर.

दुमालदार कोर्टाचा एक शिक्का


अपील कोर्टाचा शिक्का



अपील कोर्ट रीतसर स्वतंत्र होण्यापूर्वी 'राजा ऑफ कोल्हापूर' अशा सहीनें व 'हुजूर सरकार करवीर' अशा शिक्याने निवाडे दिले जात.



'श्री मार्तंड चरणी तत्पर मालोजी सुत नारायण घोरपडा अमीर उल उमराव'



'दिवानि अपील कोडत हुजूर'

न्याय, शासन व महसूल खात्यांच्या प्रमुखांचे

# कोल्हापूरचे फुल कौन्सिल

( सुमारे ६५ वर्षांपूर्वीचा हा एक दुर्मिळ फोटो )



पहिले : **कृ. ना. पंडितराव, न्यायाधीश.** ( परिचय पान २८ )

दुसरे : **सर रघुनाथ व्यंकोजी सबनीस** (१८५७ ते १९४८ )

यांची १८९८ ते १९२६ या मुदतीतील प्रदीर्घ दिवाण नात्याची कारकीर्द कोल्हापुरांत अनेक दृष्टीने संस्मरणीय ठरली. सुप्रीम कोर्टाचे एक जज् म्हणूनहि यांची नेमणूक झाली होती.

तिसरे : **रामचंद्र रघुनाथ शिरगांवकर** ( १८६० ते १९२० )

हे सुमारे तीस वर्षे येथे सरसुभे म्हणून होते. ती कारकीर्द फार यशस्वी व कर्तबगारीची होय.

# काही दिवंगत न्यायाधीश



**ब. ना. जोशी**
परिचय पान २८



**वि. ब. गोखले**
परिचय पान २९



**ए. बी. चौगुले**
परिचय पान ३१



**भा. वि. जाधव**
परिचय पान ३०